देशदूत
www.deshdoot.com
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram



# निधन वार्ता

## पीतांबर पोपट पाटील; आज अत्यंयात्रा



**फैजपूर, ता.यावल । प्रतिनिधी ।** पाल येथील प्रगतशील शेतकरी पीतांबर पोपट पाटील (मूळ रहिवासी आमोदा, वय ७८) यांचे शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ रोजी पाल येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते प्रा.प्रदीप पाटील यांचे वडील व मू.जे.महाविलयातील मनीष धांडे यांचे सासरे होत. त्यांची अंत्ययात्रा आज शनिवार, दि.१४ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पाल (ता.रावेर) येथील घरापासून निघेल.

## सौ.वैशाली विलास महाजन



**जळगाव । प्रतिनिधी ।** संमित्र कॉलनी, टेलिफोन नगर येथील रहिवासी, मूळ राहणार भादली बुद्रूक कै.सौ.वैशाली विलास महाजन (वय ६८) शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ रोजी सकाळी ३.३० वाजता अल्पशः आजाराने निधन झाले. त्या भादली येथील शाळेतील सेवानिवृत्त शिक्षिका होत्या. त्यांचे पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, जावाई, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या विलास हरी महाजन यांच्या पत्नी आणि संदीप व सौ.गौरी पंकज बऱ्हाटे यांच्या आई होत.

## भूपेंद्र चुडामण सरोदे




**खिरोदा, ता.रावेर । वार्ताहर ।** रोझोदा (ता. रावेर) येथील रहिवासी भूपेंद्र चुडामन सरोदे (वय ४७) यांचे बुधवार, दि.११ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, दोन भाऊ, वहिनी असा परिवार असून ते चुडामन सोमा सरोदे यांचे चिरंजीव होते तसेच डाळिंबी सरोदे यांचे काका व जगन्नाथ सरोदे, रवींद्र सरोदे यांचे लहान बंधू होते तसेच केतन सरोदे यांचे वडील होते.

## भीमाबाई नामदेव चौधरी



**फैजपूर, ता.यावल । प्रतिनिधी ।** गजानन नगरमधील रहिवासी भीमाबाई नामदेव चौधरी (वय ८३) यांचे मंगळवार, दि.१० मार्च २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, जावाई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या नगरपालिकेचे कर्मचारी सुधीर चौधरी, सुभाष चौधरी यांच्या आई होत.

## रामचंद्र नामदेव कोळी



**भुसावळ । प्रतिनिधी ।** येथील रहिवासी रामचंद्र नामदेव कोळी (वय ७६) यांचे शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते अशोक रामचंद्र कोळी यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन सून, दोन नातू आहेत.

पान १ वरुन...

## लोकशाहीचा कस अन् सभापतींचे आसन

ज्याचा अर्थ आवाज दाबणे असा काढणे चुकीचे आहे. आवाजी मतदानाने हा प्रस्ताव फेटाळला जाणे, हे यावर शिक्कामोर्तब करते की सभागृहाचा मोठा हिस्सा अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत आहे. लोकसभेचे अध्यक्ष हे कोणत्याही एका पक्षाचे नसून ते संपूर्ण सभागृहाचे पालक असतात. जेव्हा त्यांच्यावरच अविश्वासाचे सावट येते, तेव्हा ती लोकशाहीसाठी चिंतेची बाब ठरते. सत्ताधारी आणि विरोधकांमधील संवाद पूर्णपणे तुटल्याचे हे लक्षण आहे. जर सभापतींच्या नि:ष्पक्षतेवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित झाले, तर संसदीय संस्थांवरील सामान्य माणसाचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. केवळ आवाजी मतदानाने प्रस्ताव फेटाळला गेल्यामुळे हा विषय संपत नाही. विरोधकांचा आवाज ऐकून घेणे हे सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य आहे, तर सभागृहाची शिस्त पाळणे ही विरोधकांची जबाबदारी आहे. या दोन्हींच्या मधला बिंदू, म्हणजे सुवर्णमध्य शोधण्याचे कसब अध्यक्षांना दाखवावे लागेल. अविश्वास ठराव फेटाळला गेला असला तरी, यातून उमटलेले पडसाद दीर्घकाळ राहतील. लोकशाहीत डोके मोजण्यापेक्षा मते ऐकण्याला जास्त महत्त्व असते. संसदेचे पावित्र्य राखण्यासाठी केवळ बहुमताचा वापर न करता, सर्वसमावेशक चर्चेची संस्कृती पुन्हा जिवंत करणे हीच काळाची गरज आहे. ओम बिर्ला यांच्यासमोरील खरे आव्हान आता केवळ सभागृह चालवण्याचे नसून, विरोधकांच्या मनात पुन्हा विश्वास निर्माण करण्याचे आहे.

## ज्वलनशील रसायनांची अवैध वाहतूक रोखली: २३ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघे ताब्यात

**■ धुळे । प्रतिनिधी**

सुरत-नागपूर महामार्गावरून ज्वलनशील रसायनांची बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहतूक करून काळाबाजार करण्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला. या कारवाईत सुमारे २३ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

गुजरातमधून डिझेलसदृश्य ज्वलनशील रसायन भरून ते बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथे नेले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर एलसीबीच्या पथकाने फागणे गावाजवळ महामार्गावर सापळा रचून टँकर अडवला. वाहनाची तपासणी केली असता चालक व सहकाऱ्याने सादर केलेली कागदपत्रे संशयास्पद आढळली.

चौकशीत सदर रसायन मलकापूर येथील एका फर्मकडे नेले जात असल्याचे सांगण्यात आले. मात्र पडताळणीअंती त्या नावाची कोणतीही अधिकृत फर्म अस्तित्वात नसल्याचे समोर आले. खोटे ई-वे बिल व करचलन तयार करून त्यांचा वापर केल्याचेही तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी जीजे०३ बीव्ही८१७३ क्रमांकाचा टँकर (किंमत सुमारे १० लाख रुपये) व त्यातील ३० हजार ४८० किलो वजनाचे, सुमारे १३ लाख ८६ हजार ८४० रुपये किमतीचे ज्वलनशील रसायन असा एकूण सुमारे २३ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात विकासकुमार बबलू चौधरी (वय २३, रा. पिपलावा, बिहार) व जयदीप गिडा (रा. सुरत, गुजरात) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## चिमठाणे-शेवाडे रस्त्याच्या निकृष्ट कामावरुन रास्ता रोको; आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**■ चिमठाणे । वार्ताहर**



चिमठाणे-शेवाडे रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात चिमठाणे येथे ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन करत संताप व्यक्त केला. सुमारे दीड तास वाहतूक ठप्प झाली होती.

रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्त्यांकडून यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांनी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. आंदोलनादरम्यान मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले. आंदोलनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. तसेच पोलिसांच्या मध्यस्थीनंतर संबंधित ठेकेदाराकडून रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. काम समाधानकारक न झाल्यास ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले. आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. दरम्यान, रास्ता रोकोमुळे चिमठाणे-शेवाडे मार्गावरील वाहतूक सुमारे एक ते दीड तास ठप्प झाली होती.

## दुकानातील कॉपर वायर चोरी प्रकरण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**रावेर । प्रतिनिधी ।** रावेर येथील छोरीया मार्केटमधील एका दुकानातून सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या कॉपर वायरचे बंडल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोघांविरुद्ध रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सुमंत महाजन यांचे छोरीया मार्केट येथे युनिक वॉटर सोल्युशन नावाचे दुकान आहे. तेथे सोलर सिस्टीम व संबंधित साहित्याची विक्री केली जाते. दि. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास सुमंत महाजन हे कामानिमित्त जळगाव येथे गेले होते. त्यावेळी त्यांनी दुकानाची जबाबदारी कर्मचाऱ्यांकडे सोपवली होती. रात्री परत आल्यानंतर ते थेट घरी गेले. दुसऱ्या दिवशी २२ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता दुकान उघडल्यावर सोलर सिस्टीमसाठी लागणारे फिनोलेक्स कंपनीचे चार एम.एम.कॉपर वायरचे दोन बंडल (अंदाजे २५ हजार रुपये किंमतीचे) दुकानातून गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.२० वाजेपर्यंत कॅमेरे सुरु असल्याचे दिसून आले, तसेच त्यावेळी दुकानात कर्मचारी कुणाल संजय महाजन उपस्थित असल्याचे आढळले. त्यानंतर कॅमेरे बंद झाल्याचे दिसून आले. तपासादरम्यान सदर कॉपर वायरचे बंडल कुणाल महाजन याने चोरी करुन ते नीलेश महाजन यांना विकल्याची माहिती फिर्यादीस मिळाली. याप्रकरणी सुमंत महाजन यांनी रावेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, या दोघांविरुद्ध चोरी व चोरीचा माल खरेदी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास रावेर पोलीस करीत आहेत.

## वाळूच्या डंपरखाली चिरडल्याने तरुणाचा मृत्यू



**अमळनेर । प्रतिनिधी ।** वाळूच्या डंपरखाली चिरडला जाऊन एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास फरशी रोडवर घडली. घनश्याम तुकाराम पाटील (वय ३५, रा.देशमुख वाडा, पवन चौक) हा केटरिंग व्यवसाय करणारा तरुण गॅस तुटवडा असल्याने लाकडांची व्यवस्था करायला जळोद रस्त्यावरील सिद्धिविनायक मंगल कार्यालयात जात असताना भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरने चिरडल्याने जागीच मृत्यू झाला आहे.

## पिळोदा येथे दोन गटात हाणामारी; परस्परविरोधी गुन्हा

**अमळनेर । प्रतिनिधी**



दुकानाच्या मालकीवरुन दोन गटात हाणामारी झाल्याची घटना बुधवार, दि.११ मार्च २०२६ रोजी रात्री तालुक्यातील पिळोदा येथे ग्रामपंचायतीच्या चौकात घडली.

लतीफ इमाम खाटीक याने फिर्याद दिली की, दि.११ रोजी रात्री साडेनऊ वाजता तो त्याचे खाटीकचे दुकान बंद करत असताना समदशहा दगाशहा फकीर हा दुकानजवळ आला आणि माझे दुकान आहे म्हणत दुकानाचे साहित्य अस्ताव्यस्त फेकू लागला. त्याला मनाई केली असता, रजाकशहा दगाशाह फकीर, जाकीर दगाशहा फकीर, दगाशहा कदिरशहा फकीर, सलीम फकीर यांनी लथाबुक्क्यांनी मारहाण केली व मुलगा नवाज लतीफ खाटीक भांडण आवरायला आला असता, त्यालाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत अमळनेर पोलीस स्टेशनला भारतीय न्यायासंहिता कलम ११५ (२), १८९ (२), ३२४ (२), ३५२, ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून तपास हेडकॉन्स्टेबल गणेश पाटील करीत आहेत. तर दुसऱ्या गटातर्फे शाहरुख समदशहा फकीर याने फिर्याद दिली की, दि.११ रोजी रात्री आजोबा दगुशहा कादर्शहा फकीर यांना लतीफ इमाम खाटीक मारहाण करत होता तेव्हा मी मोबाईलमध्ये फोटो काढत होता. त्याचे शहानवाज उर्फ गुड्डू लतीफ खाटीक याला वाईट वाटले त्याने सांगितले की. तुझ्या वडिलांनी माहितीचा अधिकार टाकला आहे. तुम्हाला मारुन टाकू म्हणत लोखंडी रॉडने हाताच्या डाव्या कामेवर मारले मी खाली पडलो तेव्हा लतीफ खाटीक पण लाथाबुक्क्यांनी मारत होते. नंतर काका अरमानशहा दगुशहा फकीर आवरायला आले तर त्यांच्याही कपाळावर लोखंडी रॉडने मारले. अमळनेर पोलीस स्टेशनला दोघांविरुद्ध ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेडकॉन्स्टेबल गणेश पाटील करीत आहेत.

## महेलखेडी येथे मध्यरात्री घराला आग; सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान

**यावल । प्रतिनिधी ।** यावल तालुक्यातील महेलखेडी येथे मध्यरात्री अचानक लागलेल्या आगीत घरातील साहित्य जळून सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, महेलखेडी येथील रहिवासी नथ्थू निजाम तडवी यांच्या घरी रात्री सुमारे १ वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. आग लागल्याने घरातील विविध वस्तू जळून खाक झाल्या. घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदत करुन आग आटोक्यात आणली. घटनेची माहिती मिळताच कोरपावली तलाठी आरजू तडवी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचांसमवेत पाहणी केली. पंचनामा करताना घरातील काही साहित्य जळाल्याचे निदर्शनास आले. यात फुलर, मिक्सर, प्लास्टिक टब, इतर प्लास्टिक व लाकडी वस्तू तसेच धान्य यांचा समावेश असून अंदाजे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. या घटनेत सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. नामदेव आसाराम झुरकाळे (वय ६५) व महेंद्र सुहास पाटील यांनी पंचनाम्यावर सही केली आहे. तसेच ग्रामसेवक व पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत पंचनामा पूर्ण करण्यात आला. दरम्यान, घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी नुकसानग्रस्त कुटुंबाला शासकीय मदत मिळावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १९-१ २०२६ २४-१- २०२६ | २३५ ०२ १५६ | ६७० ३९ १३५ | ३३४ ०६ १५० | ७९० ६७ १२४ | ४५७ ६९ १२६ | ३४८ ५४ १४९ |
| २६-१ २०२६ ३१-१- २०२६ | | २५० ७६ ६०० | ३४८ ५९ २३४ | ७८८ ३५ १५९ | ७७९ १२ ७७८ | ७०० ७० २३५ |
| २-२ २०२६ ७-२- २०२६ | ३७९ ९१ ४८९ | १८८ ७८ ३७८ | ५९९ ८२ १३८ | १४७ २० १४५ | ४५६ ५४ ७८९ | २५९ ६५ २६७ |
| ९-२ २०२६ १४-२- २०२६ | ४५८ ७७ २५० | ४७९ ०० २४४ | ७८८ ३६ ४५७ | १४७ २५ ११३ | २६० ८८ ३७८ | १५६ २७ २६९ |
| १६-२ २०२६ २१-२- २०२६ | २७० ९४ ७८९ | ६७० ३१ ३८० | २३० ५५ ६९० | १३० ४९ १९९ | ६७८ १८ ३५० | १४६ १५ ३५७ |
| २३-२ २०२६ २८-२- २०२६ | ५७७ ९७ ७०० | ६९९ ४९ ४६९ | २५० ७१ ४८९ | १४६ १७ २२३ | ५८८ १२ ५८९ | १४८ ३३ ६८९ |
| २-३ २०२६ ७-३- २०२६ | १३७ १३ १४८ | २८९ ९४ ६८० | | २३४ ९० ५७८ | १४० ५६ १२३ | १५० ६३ ६७० |
| ९-३ २०२६ १४-३- २०२६ | ८९० ७० १२७ | १२९ २१ १०० | ४४५ ३० ३७० | २६० ८८ १३४ | ३३५ १५ २३० | |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| १६९ ६६ ४६६ | ३५९ ७७ ३५९ | १२७ ०८ ९९० | १३५ ९४ ७८९ | १८० ९३ ४४५ | ५७० २१ २९० |
| | ११० २७ ८९० | ४६६ ६९ २३४ | ७७९ ३१ २३६ | १३५ ९३ २५६ | ३४६ ३७ १६० |
| | २५६ ३८ ८०० | ३३४ ०० १२७ | २४० ६६ १६९ | ४५८ ७३ ५८० | २५९ ६० १४५ |
| २७० ९७ ४६७ | २५० ७२ ४८० | ५७० २४ ३५६ | ४४९ ७० ४७९ | १३७ १० २८० | १३८ २६ १६९ |
| ६८९ ३३ ४९० | २४८ ४५ २५८ | १६७ ४१ १३७ | ४८९ १३ ६८९ | २३० ५३ १३९ | ३६० ९४ ६८० |
| १५५ ११ ४६९ | २८० ०६ ३४९ | ६८९ ३९ १९९ | ४७९ ०२ २०० | ५९० ४७ १७९ | २३९ ४७ १२४ |
| २९० ११ ५७९ | २९० ११ ५७९ | | २४६ २५ २४९ | ५७० २१ ३३५ | २२५ ९५ २५८ |
| ५८० ३७ ३६८ | ३८९ ०६ १६९ | १७९ ७७ ४५८ | १०० १६ २६८ | | |


# देशदूत 'CLASSIFIED'

**सूचना** वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत'वृतपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृतपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

## पाहिजेत

जळगाव शहरात सॅमसंग अधिकृत मोबाईल सर्विसमध्ये तरुण-तरुणी पाहिजेत. कस्टमर केअर ऑफिसर, कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक १२वी पास ते पदवीधर, पहिला मजला, भीमसिंहजी मार्केट, रेल्वे स्टेशनजवळ. मो.८००७५७००७८ (व्हीएम-१३/३/२०२६)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

## पाहिजेत

हेअर कटिंग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहिजेत. न्हावी समाजाच्या गरीब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीकपासून ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यंत मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहण्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क-९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९. (CM-396320/3/1/27)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/चिकून गुनिया,जुनाट ॲलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752(VM.17/01/27. CRINIV-2526JL/CRG00550)

## फेंगशुई

सुख समृध्दीसाठी बिना तोड-फोड वास्तुदोष निवारण पारंपरीक वास्तु शास्त्र प्राचीन फेंगशुई द्वारे सर्व समाधन,फेंगशुई तज्ञ सुर्यवंशी 9403915566, (VM 23/05/26)

## दारु बंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसॲप डॉ.पालवे, ॲडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... ✻ व्यसन पेंशटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....सर्व सुविधांना परीपुर्ण:-✻व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...ॲडमिट सुविधा... ✻(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.(VM.17/01/27.CRINIV-2526JL/CRG00550)

## ज्योतीषविषयक

जीवनातील कठिन व जटिल समस्यांचे, शिक्षण, नौकरी, व्यवसाय, प्रेम विवाह, कोर्ट कचेरी, स्वास्थ्य, कोणतेही कामात बाधा येणे, १०१% कायमस्वरूपी प्रभावी उपाय।तीन पीढ़ी पासून, श्रीभृगु ज्योतिष (मां गायत्री उपासक), गुजराल पेट्रोल पंप, जळगाव मो. ९८२२७७४१५१ (व्हीएम २५/६/२०२६)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

## इलेक्ट्रॉनिक वजनकाटे

फिनिक्स, सॅनसुई, हॅवल्स, एक्सपर्ट ईगल सर्व ब्रान्डेड कंपन्यांचे इलेक्ट्रॉनिक वजनकाटे होलसेल किमतीत अधिकृत विक्री व दुरुस्ती धनश्री इलेक्ट्रॉनिक्स, गोलाणी मार्केट, जळगाव-९४२२५६६३११. (व्हीएम-०७/०७/२०२६)

स्टील, आसारी, पत्रे मोजण्यासाठी ३X६, ४X६ फूटमध्ये Heavy Duty 1 ते 5 ton capacity चे Electronic वजनकाटे उपलब्ध. संपर्क- ICON Systems, 130, जुने B.J.Market JALGAON 9422567292, 7058528182 (VM-8/3/2026)

## १००% व्यसनमुक्ती

✻गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क:9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगांव. (VM.17/01/27.CRINIV-2526JL/CRG00550)

## इंग्रजी शिकायचे?

DAMBELKARS SPOKEN ENGLISH CLASSES, Jr KG, बालवाडी पासुन ते सर्व वयापर्यंत प्रवेश सुरु, "एकदा फी भरली कि जीवन भर क्लासेस मोफत", जळगांव, भुसावळ, धुळे, शिरपुर,मो.9325562488 (VM 18 AUG 2026)

## DECLARATION

HERE BY I DECLARE THAT MY OLD NAME **MOHIYODDIN RAHIMODDIN** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **MOHIYODDIN SHAIKH RAHIMODDIN HALWAI** SO ONWARDS ALL OFFICIAL MUST BE DONE, BY MY NEW NAME ONLY.

## DECLARATION

HERE BY I DECLARE THAT MY OLD NAME **TASLIM BANO A. RAZZAK** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **TASLIM BI SHAIKH MOHIYODDIN SHAIKH** SO ONWARDS ALL OFFICIAL MUST BE DONE, BY MY NEW NAME ONLY.

## CHANGE OF NAME

I have changed my name from Mohammed Shafi Mohammed Shabbir Bagwan. New Name Mohammad Shafi Mohammad Shabbir Bagwan. Aqsa Nagar Mehrun, Jalgaon. (CM-396355)

## DECLARATION

HERE BY I DECLARE THAT MY OLD NAME **NAGMA BANO** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **NAGMA KHALID KHATIK** SO ONWARDS ALL OFFICIAL MUST BE DONE, BY MY NEW NAME ONLY.


### नशिबाची परीक्षा

शनिवार १४/३/२०२६

✻ मिलन डे ✻

१२९ ४८० २४६ — २-० — १३० २८० २४४ | सिंगल २-३-६

जोड २१-८०-९३-६४-०२

✻ कल्याण बाजार ✻

१२० ३४६ ५८० — ३-६ — १२३ १५० ११४ | सिंगल ३-७-८

जोड ३१-०६-७२-८९-६९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये. मो.९९७५४७९८२६

शुक्रवार १३/३/२०२६

कल्याण - ३३५-१५-२३०

मिलन डे - ३७८-८२-१२९

गुरुवार १२/३/२०२६

मेन बाजार - ४५८-७९-४६९

मिलन ना. - १००-१६-२६८

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १९-१ २०२६ २४-१- २०२६ | ३०० ३१ ४८९ | ३४७ ४६ १६९ | ५७० २९ ५७७ | ३९० २९ २३४ | ३४० ७० ३७० | १२८ १७ १२४ |
| २६-१ २०२६ ३१-१- २०२६ | | २३६ १६ २५९ | ११९ १३ ७७९ | ४७९ ०८ ११६ | २३९ ४९ १२६ | ३४५ २८ २३३ |
| २-२ २०२६ ७-२- २०२६ | २४६ २१ २३६ | १७० ८७ १२४ | ५९९ ३० ४६० | २४० ६६ ४४८ | २३४ ९५ २३० | १४६ १३ १३९ |
| ९-२ २०२६ १४-२- २०२६ | ४६० ०८ ८०० | २४९ ५३ १४८ | १७७ ५३ ६७० | ३७९ ९६ ३३० | ४४० ८९ २८९ | ३६६ ५८ १८९ |
| १६-२ २०२६ २१-२- २०२६ | २६९ ७७ १६० | ३८० १९ ४६९ | १९० ०२ १५६ | २६० ८९ ९०० | ५६८ ९८ ४६८ | ४७८ ९४ १५८ |
| २३-२ २०२६ २८-२- २०२६ | ११४ ६० ६७७ | २०० २८ ४६८ | ५७८ ०४ ८८८ | २५९ ६९ ४७८ | २३५ ०६ ५५६ | ३८० १९ ११७ |
| २-३ २०२६ ७-३- २०२६ | ३३४ ०५ ४५६ | ४६९ ९१ ३९९ | | २४८ ४२ २२८ | ५७० २१ ६६९ | ५५९ ९६ ८९९ |
| ९-३ २०२६ १४-३- २०२६ | ४५० ९२ १२९ | १६७ ४५ १५९ | ५६८ ९५ ७८० | ३८८ ९४ ३३८ | ३७८ ८२ १२९ | |